N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** अमरावती ग्रामीण **P.S.(ठाणे):** माहुली

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0202 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 26/09/2023 11:00

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार

**Time Period (कालावधी):** पहर 5

**Date From (दिनांक पासून):** 27/09/2023

**Date To ( दिनांक पर्यंत):** 27/09/2023

**Time From (वेळेपासून):** 13:57 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:50 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 28/09/2023 **Time (वेळ):** 02:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 003

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 28/09/2023 03:56 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 0.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** कौशल्य कॉम्प्युटर इन्स्टिट्य

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

फिर्याद दिनांक : २७/०९/२०२३

रामबाबु गणेशराव् मोंढे, वय—२९वर्ष, धंदा—शासकिय कंत्राटदार, रा.ओमनगर दुर्गवाडा,ता.मोर्शी जि.अमरावती मो.क्र. ९२८४१५२९१९

मी दिनांक.२५/०९/२३ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती येथे श्री.मिलींदकुमार बहाकर,पोलीस उप अधिक्षक, यांची भेट घेवून माझे तक्रारीबाबत माहिति दिली. त्यावरुन श्री.बहाकर,पोउपधि.यांनी विभागीय कार्यालय,एस.टी.महामंडळ,अमरावती येथे पत्र देवून पंच क्र.१ श्री.पंकजकुमार डोंगरे व पंच क्र.२ सौ.रश्मी भुजाडे यांना उपलब्ध करुन घेतले.त्यानंतर त्यांनी माझा परिचय दोन्ही पंचांना करुन दिला व पंचाचा देखील परिचय मला करुन दिला.तसेच अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय,अमरावती येथील स्टाफचा परिचय करुन दिला. त्यावेळी मी पंचाना माझी लेखी तक्रार दाखविली व ती तक्रार सर्वांसमक्ष थोडक्यात तोंडी सांगीतली. '' मी समक्ष अॅन्टी करप्शन कार्यालय,अमरावती, येथे हजर राहून फिर्यादी जबाब देतो की,मी वरील पत्यावर कुटूंबासह राहणेस असून, मी शासकिय कंत्राटदार म्हणुन काम करतो. माझेकडे जि.प.वर्धा येथील रजिस्टेशन ,असुन लायसन नं. २९/२०१७–१८,नोंदणी वर्ग–५,प्रमाणपत्राची मुदत दि.१६/०८/१७ ते दि.१५/०८/२७ आहे.

मी ग्रामपंचायत माहुली जहांगीर,ता.जि.अमरवती कडील १५ वित्त आयोग (पं.स.स्तर) अंतर्गत १.स्पेशियल रिपेअर टू वॉटर सप्लाय स्किम व २.पी.व्ही.सी.पाईप टाकुन चेंबर करून सांडपाण्याचे व्यवस्थापन करणे असे दोन कामे ग्रामपंचायात कडील वर्क ऑर्डप्रमाणे सदरचे काम पुर्ण केले आहे. मी ग्रा.पं.माहूली जाहगिंर येथील पुर्ण केलेले कामाचे मोबदल्यामध्ये ग्रा.पं.माहुली जहांगिर कडून मला आरटीजीएसव्दारे पुर्ण पेसै मिळाले. परंतु मला क्र.२ कामाचे ५१८२८/—रू.बिल मंजूर होवून जुैल २०२३ मध्ये माझे खात्यात जमा झालेनंतर माहुली जहांगीर,ता.जि.अमरावती,येथील सरपंच सौ.प्रिती मनोज बुंदीले यांचे पती श्री.मनोज बुदीले यांनी मला वांरवार फोन करून सरपंच सौ.प्रिती बुंदीले यांचे करिता ५,०००/—रू.दयावी लागेल नाहीतर यापुढे तुम्हाला ग्रा. पं.माहूली जाहंगीर येथे काम मिळणार नाही असे सांगून पैसे मागण्याचा तगादा लावला.

जर मी सरपंच सौ.प्रिती बुंदीले यांचे पती श्री.मनोज बुंदीले यांनी मागणी केल्याप्रमाणे केलेल्या कामाचे मोबदल्यात,मला ग्रा. पं.माहूली जांहगिरकडून मिळालेल्या रक्कमेमधुन ५,०००/—रू.सरंपच यांचेकरिता म्हणून त्यांचे पती श्री.मनोज बुंदीले यांना दिले नाही.तर मला शासनाकडून नवीन निघणा—या टेंडर करीता लागणा—या अनुभव प्रमाणपत्रावर सरपंच सौ.प्रिती बुदीले यांची सही व शिक्का मिळणार नाही असे श्री.मनोज बुंदीले यांनी दि.२२/०९/२०२३ रोजी फोनवर सांगितले.

त्यानंतर मी आज दि.२५/०९/२०२३ रोजी ग्राम पंचायत माहूली जांहगीर,ता.जि.अमरावती येथे मी मागील ०३ वर्षात पुर्ण केलेले कामाचे प्रमाणपत्र मिळणेकामी लेखी अर्ज केला. त्यावेळी सरपंच सौ.प्रिती बुंदीले यांचे पती श्री.मनोज बुंदीले यांनी मला फोन वर प्रमाणपत्रासाठी ग्रा.पं.ला लेखी अर्ज का केला याबाबत विचारले. त्यावेळी मी त्यांना ग्रामसेवक मॅडम यांचेकडे मी पुर्ण केलेले कामाचे अनुभव प्रमाणपत्र देण्याबाबत विचारणा केली असता, त्यांनी तोंडी मागणीवरून प्रमाणपत्र देण्यास नकार दिल्याने, मी लेखी अर्ज केल्याचे सांगीतले. त्यावेळी सरंपच पती श्री.मनोज बुंदीले यांनी प्रमाणपत्रावर सरपंच यांची सही पाहीजे असल्यास सरंपच यांचेकरिता ५,०००/—रू.दयावे लागतील असे सांगीतले. त्यांनतर तुम्हाला अनुभव प्रमाणपत्रावर सरंपच यांची सही व शिक्का मिळेल असे सांगीतले. त्यावर मी विचार करून सांगतो असे म्हणालो.

परंतू मला ग्रा.पं.माहूली जहांगीर कडील मी पुर्ण केलेले कामाचे अनुभव प्रमाणपत्रावर सरपंच सौ.प्रिती मनोज बुंदीले यांची सही व शिक्का मिळण्याकरिता श्री.मनोज. बुदीले यांना ५,०००/—रू.लाच देण्याची इच्छा नसल्याने, त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही व्हावी याकरीता आपणाकडे तक्रार देत आहे.माहुली जहांगिर,ता.जि.अमरावती सरपंच सौ.प्रिती बुंदीले वा त्यांचे पती श्री.मनोज बुदीले यांचे सोबत माझा कोणताही आर्थिक व्यवहार नसुन, त्यांच्याशी माझा कोणत्याही प्रकारचा वैयक्तीक वाद नाही.तरी माझे तक्रारीवर कारवाई व्हावी विंनती.." अशी लेखी तक्रार नोंदविली.त्यानंतर पोउपअधि.श्री.बहाकर यांनी मला व दोन्ही पंचांना महत्वाच्या सुचना देवून पडताळर्णापुर्व पंचनामा कार्यवाही केली.त्यानंतर सरपंच सौ.बुदीले यांचे पती मनोज बुंदीले यांनी माझेकडे खरोखर लाचेची मागणी केली आहे काय?याबाबत पडताळणी कारवाई करण्याकरिता सरपंच पती श्री.मनोज बुंदीले हजर आहेत कार्य? याबाबत मला माहीती घेण्यास सांगीतले असता, मी श्री.मनोज बुदीले यांना फोन करून माहीती घेतली असता, ते हजर नसल्याचे व त्यांनी दि. २६/०९/२३ रोजी भेटण्यास सांगीतले. त्यामुळे सापळा पथकातील सर्वांनी मिळून पडताळणी कारवाई दि.२६/०९/२०२३ रोजी करण्याचे ठरविले.त्यावेळी पोउपअधि.श्री.बहाकर यांनी मला,पंच व सापळा पथकाला आवश्यक त्या गोपनियतेबाबत सुचना दिल्या.

त्यानंतर दि.२६/०९/२३ रोजी मी अं.सकाळी.११/००वा.ला.प्र.वि.अमरावती कार्यालयात आलो असता,कार्यालयात पोउपअधि.श्री.बहाकर,दोन्ही पंच व सापळा पथक हजर होते.त्यावेळी पोउपअधि.श्री.बहाकर यांनी पडताळणीपुर्व पंचनाम्यातील सुचनांची मला व पंचाना उजळणी करून दिली व सर्वानुमते पडताळणी कारवाई करण्याचे ठरविले. त्यानंतर मला सरपंच सौ.बुदीले यांचे पती मनोज बुंदीले हे हजर आहेत काय? याबाबत माहीती घेण्यास सांगीतले. मी सरपंच सौ.बुंदीले यांचे पती मनोज बुंदीले हे

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री. रामबाबु गणेश मोंढे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1994

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | ओम नगर दुर्गवाडा,मोर्शी,अमरावती ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | ओम नगर दुर्गवाडा,मोर्शी,अमरावती ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. मनोज रत्नाकर बुंदले | | | 1. वार्ड नं 4 माहुली जहाँगीर, माहुली,अमरावती ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |
| 2 | सौ. प्रिती मनोज बुंदले | | | 1. वार्ड नं 4 माहुली जहाँगीर, माहुली,अमरावती ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

घरी हजर आहेत याबाबत माहीती घेतली तर ते हजर नसल्याचे समजले. त्यावेळी मी श्री.मनोज बुंदीले यांना फोन केला असता, त्यांनी फोन उचलला नाही.त्यानंतर काही वेळाने श्री.मनोज बुंदीले यांचा मला फोन आला व ते मिटींगकामी अमरावती येथे आले असून, मिटींग संपलेनंतर ते भेटतील असे सांगीतले. त्यांनतर सायंकाळी.०६/००वा.चे सुमारास मला श्री.मनोज बुंदीले यांचा फोन, आला व त्यांनी मला जयस्तंभ चौक अमरावती येथे भेटण्यास सांगीतले.त्यावेळी. पोउपअधि.श्री.बहाकर यांचे सुचनेवरून पोशी/शैलेश कडु यांनी नविन मेमरी कार्ड काढून ते डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये टाकून रेकॉर्डर माझेजवळ देवून पंच क्र.१ श्री. डोंगरे यांचेसह श्री.मनोज बुंदीले, यांना भेटण्याकरिता जयस्तंभ चौक, अमरावती येथे माझे चारचाकी वाहनाने रवाना झालो.त्यानंतर जयस्तंभ, चौक,अमरावती येथे पोहचून,मी पंच क्र.१ श्री.डोंगरे असे चौकात कारमध्ये बसून थांबलो असताना,काही वेळाने तेथे श्री. मनोज बुंदीले हे त्यांचे दुचाकीवरून आले. त्यावेळी मी पंच क्र.१ श्री.डोंगरे यांचेसमक्ष श्री.मनोज बुंदीले यांना माझे अनुभव प्रमाणपत्राचे अनुषंगाने बोलावयास सुरवात केली.त्यावेळी मी श्री.मनोज बुंदीले यांना अनुभव प्रमाणपत्रावर त्यांची पत्नि व सरपंच सौ.प्रिती बुंदीले यांचे सही व शिक्कयासाठी ५०००/—रू.लाच रक्कम जास्त होतै,त्यामुळे पैसे कमी करण्याबाबत त्यांना विनंती केली असता,श्री.मनोज बुंदीले यांनी तडजोडीअंती ४०००/—रू.लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली.त्यावेळी लाच रक्कम ४०००/—रू.उदया दि.२७/०९/२३ रोजी देतो असे सांगून तेथून निघून,मी व पंच क्र.१ श्री.डोंगरे असे ला.प्र.वि.अमरावती कार्यालयात परत आलो.

अशाप्रकारे ग्रा.पं.माहूली जहागिर सरपंच सौ.प्रिती बुंदीले यांचे पती श्री.मनोज बुंदीले यांनी मला मी ग्रा.पं.माहूली जाहगींर येथे पुर्ण केलेले कामाचे अनुभव प्रमाणपत्रावर सरपंच सौ.बुंदीले यांची सही व शिक्का घेवून देण्यासाठी त्यांनी माझेकडे पंच क्र.१ श्री.डोंगरे यांचे समक्ष ४०००/—रू. लाचेची मागणी करून,लाच स्विकारण्याची तयारी दर्शविल्याचे निष्पन्न झाल्याने,सापळा कारवाई उदयिक रोजी दि.२७/०९/२३ रोजी आजमाविण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आल्याने,पोउपअधि.श्री.बहाकर यांनी मला,पंच व सापळा पथकाला आवश्यक त्या गोपनियतेबाबत सुचना दिल्या.

त्यानंतर आज दि.२७/०९/२३ रोजी मी अंदाजे सकाळी.११/००वा.ला.प्र.वि.अमरावती कार्यालयात आलो त्यावेळी कार्यालयात पोउपअधि.श्री.बहाकर,दोन्ही पंच व सापळा पथक हजर होते.त्यावेळी पोउपअधि.श्री.बहाकर यांनी मला व पंचाना सांगीतले की,ग्रा.पं.माहूली जहागिंर सरपंच यांचे पती श्री.बुंदीले यांनी त्यांचे लोकसेवक सरपंच पत्नि सौ.बुंदीले यांचे नावाने लाच मागणी केली आहे. त्यामुळे लोकसेवक सरपंच सौ.बुंदीले यांची त्यांचे पतीचे लाच मागणीस होकार, समर्थन आहे अगर कसे याबाबत पडताळणी करणे अवश्यक असल्याचे सांगीतले. त्यावेळी मी पोउपअधि.श्री.बहाकर व पंचाना सांगीतले की, सरपंच सौ. बुंदीले यांची वैयक्तीक लाच मागणी संदर्भात पडताळणी केल्यास त्यांना संशय येईल असे सांगीतले. त्यावेळी सर्वानुमते असे ठरले की, आपण सरपंच पती श्री.बुंदीले यांचेवर सापळा कारवाई आजमाविताना सरपंच सौ.बुंदीले यांचेशी या लाचेच्या संबधाने बोलणी करायची व सापळा कारवाई शक्यतो घरामध्ये न आजमाविता घराबाहेर किंवा इन्स्टीटयुटमध्ये आजमाविण्याचे ठरले. त्यांनतर लागलीच सापळा कारवाई आजमावण्याचे ठरवून पोउपअधि.श्री.बहाकर यांनी मला व पंचाना सापळापुर्व कारवाई करणार असल्याचे सागुंन,मला श्री.मनोज बुंदीले यांना देण्याकरीता लाच रक्कम हजर करण्यास सांगीतली.त्यावेळी मी माझेकडील ५०० रु.दराच्या ८ नोटा एकुण ४०००/—रु.हजर केले.त्यावेळी पोउपअधि.श्री.बहाकर यांनी सांगीतले की,आता सदर नोटांना ॲंथ्रासिन पावडर लावणार आहोत.त्यानंतर पोकॉ./वैभव जायले यांनी आम्हाला ॲंथ्रासिन पावडर व अॅट्राव्हायलेट लॅम्प बाबत माहीती देवून त्या नोटांना ॲंथ्रासिन पावडर लावण्यात येवून मला व दोन्ही पंचांना सापळा कारवाई बाबतच्या महत्वाच्या सुचना देण्यात आल्या व मला श्री. बुंदीले जेव्हा लाच रक्कम स्विकारेल तेव्हा पोउपअधि.श्री.बहाकर यांना मिसकॉल देणे,हा पैसे स्विकारले बाबतचा ईशारा ठरला. त्यानंतर पोउपअधि.श्री.बहाकर यांनी मला व पंचांना सांगितले की, आता आपण माहूली जाहगिंर येथे जावुन सरपंच पती श्री.बुंदीले यांचेविरुध्द सापळा आयोजित करणार आहोत.त्यावेळी मी माझे दुचाकीने माहूली जाहगिर कडे रवाना झालो व सापळा पथक शासकीय वाहनाने सोबत रवाना झाले. त्यावेळी सापळा पथक माहुली जाहगिंर रोडवर निर्जनस्थळी थांबले, त्यावेळी मी ही तेथे पोहचलो. त्यानंतर काही वेळाने मी श्री.मनोज बुंदीले यांना फोन करून भेटायला कोठे येवू याबाबत विचारले असता,त्यांनी त्यांचे कौशल्य कॉम्प्युटर इन्स्टीटयुटला या असे कळविले, त्यावेळी पोउपअधि.श्री.बहाकर यांनी पोशि/कडू यांना सुचना दिलेवरून त्यांनी सोनि कं.चे व्हाईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन ते सुरु करुन माझे जवळ देण्यात आले,तेव्हा मी व पंच क्र.१ श्री.डोगरे रवाना झालो.त्याचवेळी आमचे. मागोमाग सापळा कारवाईतील सर्व सदस्य आले व कौशल्य कॉम्प्युटर इन्स्टीटयुट,माहूली जाहगिंर परिसरात आजू—बाजूला थांबुन सापळा आयोजित केला. त्यावेळी मी व पंच क्र.१ श्री.डोगरे असे दुचाकी वाहनाने तेथे पोहचलो. त्यावेळी मी व पंच क्र.१ श्री.डोंगरे असे कौशल्य कॉम्प्युटर इन्स्टीटयुटमध्ये जावून पाहता श्री.बुंदीले हे इन्स्टीटयुटचे वरील रूममध्ये बसले.त्यावेळी मी श्री.बुदींले यांचेशी माझे अनुभव प्रमाणपत्रावरील संरपच सौ.बुदीले यांचे सहीबाबात विचारपूस केली असता,श्री. बुदींले यांनी मला सदरचे प्रमाणपत्र ग्राम पंचायत कार्यालयात असून,सरपंच सौ.बुंदीले या स्वत: त्याबाबत ग्रामसचिव यांचेशी प्रामणपत्राबाबत बोलतील त्यासाठी तुम्ही आमचे घरी चला असे सांगीतले वरून, मी व पच क्र. १ श्री.डोंगरे असे श्री.बुंदीले

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 4000 रु. लाचची रक्कम | 4,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

4,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

हकीकत अशा प्रकारे आहे कि, ला. प्र.वि अमरावती तर्फे करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही व सापळा कार्यवाही दरम्यान ग्रामपंचायत माहूली जहागिर,ता.जि.अमरावती येथील आरोपी क्र 2 यांनी आपले पदाचा दुरूपयोग करून,स्वतःचे आर्थिक फायदयाकरिता बक्षीस म्हणुन,फिर्यादी यांनी ग्रामपंचायत माहूली जहागिर येथे पुर्ण केलेले कामाचे प्रमाणपत्रावर आरोपी क्र 2 यांचा सही व शिक्का देणेसाठी स्वतः फिर्यादी कडे लाच रक्कम मागणी करून, लाच रक्कम आरोपी क्र 1यांना देण्यास सांगितले. आरोपी क्र 2 यांचे पती आरोपी क्र 1 यांनी त्यांची सरपंच पत्निची फिर्यादीने पुर्ण केलेले कामाचे प्रमाणपत्रावर आरोपी क्र 2 यांचा सही व शिक्का घेवुन देणेसाठी फिर्यादीकडे 4000/-रू. लाच रक्कम मागणी करून लाच रक्कम स्विकारल्याने आरोपी क्र 1 याला लाच रक्कमेसह ताब्यात घेण्यात आले म्हणून माझी त्यांचे विरूध्द फिर्याद आहे.फिर्यादी यांचे लेखी फिर्याद वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
GAJANAN RAMCHANDRA DHARMALE
**Rank (पद):** HC (Head Constable) **No.(क्र.):** 670
**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

पोलीस स्टेशन, माहुली जहांगिर
अमरावती (ग्रामीण)

यांचेसह त्यांचे राहते घरी सरपंच सौ.बुंदीले यांची भेट घेण्याकरिता गेलो असता, श्री.बुंदीले यांनी पंच क्र.१ श्री.डोंगरे यांना घराबाहेर थांबण्यास सांगीतले. त्यानंतर मी, माझे अनुभव प्रमाणपत्रावरील त्यांचे सहीबाबत व त्यांचे पती श्री.बुंदीले यांनी मागीतलेले लाच रक्कमेबाबत सरपंच सौ.प्रिती बुदीले यांचेशी बोललो असता, सरपंच सौ.प्रिती बुंदीले यांनी मला त्यांचे पती श्री.मनोज बुंदीले यांनी माझेकडे केलेले ४०००/–रू.लाच मागणीस होकार व समर्थन देवून, पती श्री.मनोज बुंदीले यांनी केलेले लाच मागणीप्रमाणे लाच रक्कम देण्याबाबत सांगीतले. त्यानंतर मी सापळापुर्व कारवाईतील सुचनाप्रमाणे श्री.बुंदीले यांना माझेकडे सध्या पैसे कमी असल्याचे कारण सांगून मी काही वेळात पुर्ण पैस आणून देतो आपण इन्स्टीटयुटला या असे सांगून मी व पंच क्र. १ श्री.डोंगरे असे तेथून निघून आलो व श्री.बुंदीले यांची त्यांचे कौशल्य कॉम्प्युटर इन्स्टीटयुटजवळ येवून वाट पाहत थांबलो. त्यानंतर काही वेळाने श्री. बुंदीले हे त्यांचे कौशल्य कॉम्प्युटर इन्स्टीटयुटमध्ये आले व त्यांनी मला आतमध्ये बोलावीले. त्यावेळी मी त्यांना अनुभव प्रमाणपत्रावरील सरपंच यांचे सहीबाबत विचारणा केली असता, त्यांनी प्रमाणपत्रावर सही झाल्याचे सांगून,प्रमाणपत्रे ग्राम पंचायत कार्यालयात असल्याचे सांगीतले,त्यावेळी मी माझे पॅन्टचे खिशात ठेवलेले ४०००/–रू.लाच रक्कम उजव्या हाताने काढून दिले व पैस मोजून घ्या असे म्हणालो असता,श्री.बुंदीले यांनी ठिक आहे असे म्हणून पैसे त्यांचे समोरील लाकडी टेबलाचे ड्रावरमध्ये ठेवण्यास सांगीतले.त्यावेळी मी पोउपअधि.श्री.बहाकर यांना मिसकॉल देवून,लाच रक्कम स्विकारण्या बाबतचा नियोजीत इशारा केला असता, पोउपअधि.श्री.बहाकर व सापळा पथक लागलीच आले. पोउपअधि.श्री.बहाकर व पथक यांनी,श्री.मनोज बुंदीले यांना ताब्यात घेतले व पोशि/कडु यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद केले.

त्यानंतर पोउपअधि.श्री.बहाकर यांनी श्री.मनोज बुंदीले यांना स्वतःचा व सापळा पथकाचा परिचय करून दिला व श्री. बुंदीले यांना लाच रक्कमेबाबत विचारणा केली असता, श्री.बुदीले यांनी त्यांचे समोरील लाकडी टेबलाचे ड्रावरमध्ये ठेवलेली लाच रक्कम काढून दिली. त्यानंतर पोउपअधि.श्री.बहाकर यांनी श्री.बुंदीले यांना त्यांचे नाव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव श्री.मनोज रत्नाकर बुंदीले, वय–४२वर्षे,रा.वार्ड नं.४,माहूली जहागिंर,ता.जि.अमरावती असे सांगीतले.त्यानंतर पोउपअधि.श्री.बहाकर यांनी सदर ला.प्र.वि.चे सापळा कारवाई बाबत पोस्टे.माहुली जाहगिंर येथे ठाणे दैंनदीनीस नोदं घेवुन पुढिल कारवाई करिता आम्ही सर्व ला.प्र.वि.अमरावती,येथे आलो व पोउपअधि.श्री.बहाकर यांनी केलेल्या पडताळणी व सापळा कार्यवाहीचा सवस्तिर पंचनामा केला.

अशाप्रकारे पडताळणी कार्यवाही दरम्यान ग्रामपंचायत माहूली जहागिर,ता.जि.अमरावती येथील सरपंच सौ.प्रिती मनोज बुंदीले,वय–३४वर्षे,रा.वार्ड नं.४,माहूली जाहगिर ता.जि.अमरावती यांनी आपले पदाचा दुरूपयोग करून,स्वतःचे आर्थिक फायदयाकरिता बक्षीस म्हणुन,मी ग्रामपंचायत माहूली जहागिर येथे पुर्ण केलेले कामाचे प्रमाणपत्रावर त्यांचा सही व शिक्का देणेसाठी स्वतः माझेकडे लाच रक्कम मागणी करून,लाच रक्कम त्यांचे पतीकडे देण्यास सांगीतले. सरपचं सौ.बुंदीले यांचे पती श्री.मनोज रत्नाकर बुंदीले, वय–४२वर्षे व्यवसाय–कॉम्प्युटर इन्स्टिटयुट, रा.माहुली जहागीर यांनी त्यांची सरपंच पत्निची मी पुर्ण केलेले कामाचे प्रमाणपत्रावर त्यांचा सही व शिक्का घेवुन देणेसाठी माझेकडे ४०००/–रू. लाच रक्कम मागणी करून लाच रक्कम स्विकारल्याने त्यांना लाच रक्कमेसह ताब्यात घेण्यात आले म्हणून माझी त्यांचे विरूध्द फिर्याद आहे.

माझी वरिल संगणकावर टाईप केलेली मराठीतील फिर्याद,प्रिंट काढूण मला वाचण्यास दिली असता, ती मी वाचून वाचुन पाहली असता, घडलेल्या वस्तुस्थितीप्रमाणे बरोबर व खरी आहे.

फिर्यादीची सही

समक्ष

( मिलींदकुमार बहाकर )
पोलीस उप अधिक्षक
ला.प्र.वि.अमरावती

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): MILIND HARICHADR/
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 15101000402MHSM80(

स्टेशन डायरी अंमलदार
पो. स्टे माहुली जहा
अमरावती ग्रा

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या ा खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(**जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.**)**